भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७७२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/११/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/११/२०१७ चे २१.०० वाजता दरम्यान यातील नमुद आरोपी क्र. ०१ व ०२ यांनी फिर्यादीस तुझी साळी आणी भाची माल दिसते १००रु/– घे असे म्हणुन अश्लिल शब्दात बोलले म्हणुन फिर्यादीने आरोपी क्र. ०१ यास थापडाने मारले म्हणुन यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे घरासमोर जावुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारहान केली त्या दरम्यान फिर्यादीची बहीन भांडण सोडवीण्यास गेली असता, तिचा हात धरून विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १४३,१४७,२९४,३५४,३२३ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून विनयभंग करुन मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक १६/११/२०१७ चे २१.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे भावासोबत घरा समोर उभा असतांनी यातील आरोपी क्र.०१ नी फिर्यादीचे भावाला तु आम्हाला कशाला टॉनटींग (ताने) करतो असे म्हणुन शिवीगाळ करून थापडाने मारले व घरून लोखंडी रॉड घेवुन यातील आरोपी सह गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस मारहान केली त्या दरम्यान फिर्यादीची आई भांडण सोडवीण्यास आली असता, विनयभंग करून मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १४३,१४७,१४८,३५४,५०४,५०६,३२३ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३)अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/११/२०१७ चे १४.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही तिचे शेतात एकटीच काम करीत असतांना फिर्यादीचा पाठलाग करून अश्लिल शब्दात बोलुन तिचा विनयभंग करीत असतांना फिर्यादीचा भाऊ यास पाहुन आरोपी पळुन जात असतांनी फिर्यादीचे भावाने पकडण्याचे प्रयत्न केले असता त्याला सुध्दा जबरदस्तीने धक्का मारून पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम,३५४,(अ)(१)(I) (ड)(I) भा.दं.वी. सहकलम १२ बा.लै. अ.प्र.कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चौव्हान पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

## ४) मोटार सायकलची चोरी .:–

दिनांक १७/११/२०१७ चे १६.४५ ते १७.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी संकेत लक्ष्मण शेंद्रे वय २१ वर्ष, रा. धुसाळा हमु. तात्याटोपे वार्ड भंडारा याचा आते भाऊ प्रमोद नथ्थु ठवकर याने त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ७६७९ किंमती ३०,०००/रु ची बसस्थानकचे आवारात ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. शेंडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

## ५) मोटार सायकलची चोरी .:–

दिनांक ०८/११/२०१७ ते दि. ९/११/२०१७ चे २४.०० ते ०३.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी नितीन सुरेश राऊत वय २६ वर्ष, रा. अडयाळ यानी त्याची हिरो कंपनीची पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु २१३७ किमती २५,०००/रु ची त्याचे मामाचे घरासमोरील अंगणात ठेवुन गावात नाटकाचा कार्यक्रम पाहण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

## ६) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी .:–

दिनांक १६/११/२०१७ चे २२.१७ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी शुभम चद्रप्रकाश चिरवतकर वय २१ वर्ष, रा. बांम्पेवाडा हा त्याचा काके भाऊ निखील अशोक चिरवतकर वय १८ वर्षरा. बाम्पेवाडा याचे सोबत त्यांचे मोटार सायकल क्र. एमएच ३६/१४९३ ने साकोली येथे येत असता विरूध्द दिशेने येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला पिंडकेपार येथे धडक देवुन फिर्यादी व त्याचे काके भाऊ यांना जखमी करण्यास कारणीभुत होवुन अपघाताची सुचना न देता पडुन गेल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९७,३३७ भा.दं.वी.सहकलम १३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

७) अज्ञात बसच्या/शडकेत दोन जखमी.:—

दिनांक १६/११/२०१७ चे १६.१५ वाजता. दरम्यान यातील जखमी फिर्यादी मंगला रामदास झेलकर वय ४० वर्ष, रा. रोहा ही तिचे पती सोबत जखमी रामदास पाठोबा झेलकर वय ४५ वर्ष रा. रोहा यांचे सह मोटार सायकल क्र. एमएच ४० एडी ३९७२ ने पेट्रोलपंप ठाणा येथुन रोहा येथे त्याचे गावी जात असतांना यातील आरोपी पिवळया रंगाची शाळेच्या बसच्या अज्ञात चालकाने त्याचे ताब्यीाल बस ही भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळीपणे चालवुन जखमीचे मोटार सायकलला शाहापुर येथे मागेहुन धडक मारून फिर्यादी व फिर्यादीचे पती रामदास यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पडुन गेल्याने जखमींना गंभिर मार लागल्याने त्यास उपचारा करीता लक्ष हॉस्पीटल भंडारा येथे भरती केले असुन पो.स्टे. भंडाराचे जावक क्र.६५५८/१७ दिंनाक १५/११/२०१७ चे कागदपत्र आज रोजी टपालाने प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. कांबळे यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २९७,३३७,३३८ भा.दं.वी.सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

८) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :—

दिनांक १७/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, वरठी, तुमसर, सिहोरा, लाखनी पवनी व भंडारा येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७१ लिटर हातभट्टी दारू किंमती ५,५४०/—रूपया व ४ लिटर ८६० मिली लिटर देशी /विदेशी दारू किंमती १,४८२/—रु. तसेच जुगारातुन किंमती २०७८/—रु असा एकुण किंमती ९,१००/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.